# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०६/२०१८

**१) संगनमत करुन विवाहितेला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/१२/२०१६ ते २१/०७/२०१७ पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तु लग्न मध्ये बरोबर सामान आणले नाही म्हणुन पैशाची मागणी करुन मानसिक व शारीरिक त्रास दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट व महिला समुपदेशनप केंद्र यांचे अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) लोखंडी दरवाजे व सिलींग फॅनची चोरी :–**

दिनांक ३१/०६/२०१८ चे ०७.०० ते ०१/०६/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराला समोरील दाराचा ताला तोडुन घरात आत प्रवेश करुन घरातील ४ लोखंडी दरवाजे, १ सिलींग फॅन असा एकुण ४,०००/–रु. माल चोरुन नेल्याने फिर्यादी संजु गणपत खंडरे वय ३५ वर्ष, रा. गणेश मंदीर नेहरु वार्ड मेंढा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार पंपची चोरी :–**

दिनांक ३०/०६/२०१८ चे २३.०० ते ३१/०५/२०१८ चे ०७.०० यातील फिर्यादी महेश हेमराज शेंबरे वय ३१ वर्ष, रा. गोवारीटोला यांचे शेतातील विहीरीवर लावलेली आक्वा स्टॉर कंपनीची १.५ एचपी मोटार पंप किंमती ७,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कोणही नसल्याची संधी साधुन पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन अवैद्यरित्या चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे १०.३० यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये त्याचे मालका सोबत संगनमत करुन अंदाजे १ ब्रास रेती किंमती २,०००/–रु. ची अवैद्यरित्या चोरी करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी भगवान बाबुरावजी मोहरकर वय ५३ वर्ष,रा. जुनोना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास, पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ३०/०५/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही नातेवाईकाचे घरी गेली असता फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी असतांना यातील संशयीत आरोपीने फिर्यादीचे मुलीस फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) मॅटेडोर वाहन लापरवाहीने चालवुन वाहनाला धडक देवुन अपघात केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे ०९.०० यातील फिर्यादी मकसुद मकबुल रहमद शेख वय ३८ वर्ष, रा. शास्त्री वार्ड यशोदा सभागृहा जवळ गोंदिया हा आपले मॅटडोर वाहन क्र. एमच ३५ के १२६६ ने गोंदिया ते वरठी मार्गे नागपुर येथे जात असतांना विरुध्द दिशेने येणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन समोरील वाहनाला अनुराग कॉलेज जवळ वरठी ते मोहाडी येथे धडक देवुन अपघात केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,४२७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटोले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**७) दखलपात्र गुन्हा करण्याच्या हेतुने फिरतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे ०३.०० यातील आरोपी हा कब्जात घरफोडी करण्याचे हत्यारे आपल्या ताब्यात घेवुन रात्रीच्या वेळी सागवनाच्या झाडाचे आडोशाने आपले अस्तित्व लपवण्याचे स्थितीत रात्र घरफोडी सारखा दखलपात्र गुन्हा करण्याच्या हेतुने फिरताना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. संतापे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १२२ ब,ड,ई मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इळपाते पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे. आरोपी अटक आहे.

८)दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने शस्त्रानिशी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०२/०६/२०१८ चे ०३.०० यातील आरोपी हे खरबी गावात रात्री अंधाराचा फायदा घेवुन संशयास्पद स्थितीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रानिशी मिळुन आल्याने त्यांना त्याबाबत विचारणा केली असता उडवाउडवीचे उत्तर दिल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनि. मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १२२ अबक मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. मेश्राम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे. आरोपी अटक आहे.

९) बारमधील साहित्यांची चोरी :—

दिनांक २८/०६/२०१८ चे १८.०० ते ०२/०६/२०१८ चे १४.०० यातील फिर्यादी धनराज शामराव राखे वय ४० वर्ष, रा. परसोडी हा शहापुर गावातील एनएच ६ रोडचे बाजुला जुने सिलबंद असलेले वापरात नसलेल्या बारच्या समोरील दारचा ताला तोडुन आत प्रवेश करुन यातील अज्ञात चोराने आत ठेवलेली १ गोदरेज आलमारी जुनी, २ जुने कुलर, लोखंडी खुर्च्या १० नग, लोखंडी टेबल प्लाऊड लागलेले ३ नग, सिलींग फॅन जुने, बारमधील जुने पुराने स्टेशनरी सामान असा एकुण ११,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४६१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

१०) मोटार सायकल चालकाने पायी महिलेस धडक देवुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०२/०६/२०१८ चे १८.४५ ते १९.१५ यातील फिर्यादीची माऊशी जखमी सौ कमलाबाई आंनदराव मानकर वय ६५ वर्ष, रा. पांजरा बोळी ही पालोरा येथुन बाजार करुन पायी येत असतांना यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मागेहुन पालोरा ते करडी येथे धडक मारुन जखमी महिलेचे डावे पायास व कपाळावर गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी भगवान दशरथ घोनमोडे वय ४४ वर्ष रा. पांजरा बोळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बोन्द्र पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

११) जनावरांची चारापाण्याची वैद्यकीय प्रमाणपत्रे सोबत न बाळगता अैवद्यरित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०१/०६/२०१८ चे २४.०० यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये गायी, लहान बैल, मोठे बैल असे एकुण ३१ जनावरे किंमती ७०,०००/—रु. चे डांबुन, कोंबुन त्याना निदर्यतेने वागणुक देवुन जनावरांची चारापाण्याची, वैद्यकीय प्रमाणपत्रे सोबत न बाळगता अवैद्यरित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुसावळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१)(ड)(ई)प्रा.नि.वा.का.सहकलम ५(अ)(१)प्रा.नि.वा.सं.कायदा २०१५ सहकलम ६६/१९२ मोवाका. भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. देशमुख पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

१२) नदीचे पाण्यात बुडुन युवकांचा मृत्यु :—

दिनांक ०२/०६/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील मृतक विनोद गोंविद तिघरे वय २१ वर्ष, रा. वलनी हा मतीमंद असुन तो कोणालाही न सांगता घरुन निघुन गेला होता फिर्यादीला फोन व्द्रारे माहिती मिळाली की यातील मृतक हा वैजेश्वर नदी पात्र पवनी येथे पाण्यात बुडुन मरण पावल्याची माहीती मिळाली व त्याचे मरणाबाबत माझा कोणवरही संशय नाही अशा फिर्यादी भोला गोविंद तिघरे वय २६ वर्ष, रा. वलनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

१३) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान वृध्दाचा मृत्यु :—

दिनांक ३१/०५/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक सोनाजी ईस्नाजी राहांगडाले वय ८५ वर्ष, रा. सुकळी गोंदियाटोला दिनांक २८/०५/२०१८ चे १६.३५ वाजता. दरम्यान विषारी औषधी प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता केटीएस दवाखाना गोंदिया येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. गोंदिया येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. पिकलमुंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**१४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो पिकअप वाहन दवाखाना चौक गोबरवाही येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत.

**१५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरा पिकअप वाहन एकोडी फाटा येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**१६) अवैध हातभट्टी,देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०२/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन वरठी व तुमसर येथे हातभट्टी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हातभट्टी किंमती ३६००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३, तीन सिटर वाहनाकरीता– ०३ ईतर वाहनांवरती – ८४ केसेस करण्यात आले आहे.


(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.